**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१**
**फोन नं.(०२०) २६०५०६४१**

ई-मेलआयडी:-comscea.pune@maharashtra.gov.in secscea.pune@maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष१६/जमाआआ/सन २०१५ दि. १८/०२/२०१५

वाचावे:-१) केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ५ (१)
२) आदेश क्रं.रासनिप्रा/माहिती अधिकारी नेमणूका/१४/१०८७ दिनांक १८/१२/२०१४
३) परिपत्रक क्र.रासनिप्रा/कामकाज वाटप/२०१४,दि.३१/१२/२०१४

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी, प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.रासनिप्रा/कामकाज वाटप/२०१४,दि.३१/१२/२०१४ अन्वये एकुण १६ कक्ष प्रमुख यांचेकडे कामकाजाबाबतचे विभाग निहाय वाटप केले असून,उक्त वाटपाअंतर्गत संबंधित कक्षप्रमुखांनी आपल्या कक्षाशी संबंधित माहिती अधिकार अर्जावर कार्यवाही करणेबाबत नमुद केले आहे. त्यानुसार संबंधित कक्ष प्रमुखांना माहितीचा अधिनियम २००५ मधील नियम क्रं.५ (१) नुसार पद निर्देशित करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, प्राधिकरणाचे आदेश क्रं.रासनिप्रा/माहिती अधिकारी नेमणूका/१४/१०८७ दिनांक १८/१२/२०१४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राधिकरणाकडील प्राप्त अर्जावर कार्यवाही करण्यासाठी श्री.जे.पी.शिंदे, प्रशासकीय अधिकारी यांना जनमाहिती अधिकारी व श्री. श्रीकृष्ण वाडेकर ,सहाय्यक सहकारी निवडणूक अधिकारी यांना अपिलीय अधिकारी म्हणून यापूर्वी घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी, प्राधिकरणातील कार्यरत असलेल्या एकुण १६ कक्ष प्रमुख तथा सहाय्यक प्रशासकीय अधिकारी व लेखाअधिकारी यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करणेबाबचे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**-:आदेश :-**

सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या अनुषंगाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करणेसाठी प्राधिकरणातील कार्यरत असलेल्या व त्यांना वरील दिनांक ३१/१२/२०१४ चे परिपत्रकानुसार वाटप केलेल्या कामकाजाप्रमाणे नेमून दिलेल्या विभागानुसार एकुण १६ कक्ष प्रमुख तथा सहाय्यक प्रशासकीय अधिकारी व लेखाअधिकारी यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा.पुणे यांचे आदेशानुसार.**

(स्वाक्षरी)

**(डॉ.आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

सर्व संबंधित कक्ष प्रमुख

Scanned with CamScanner